सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्राथमिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज २५९ ठ. क्र. २९६
दि. १५/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



क्रिडा कार्यालयाकडील एकवट मानधनावरील जीवरक्षक यांचे मानधनात वाढ करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर विभागाकडील कार्यरत असलेले १) श्री. नादरगी नरेंद्र मोहन २) श्री. कोंडा दिगंबर रामचंद्र ३) श्री. परळकर युवराज प्रभाकर या एकवट मानधनावरील जीवरक्षक सेवकांनी सध्याच्या महागाईच्या दिवसात दैनंदिन गरजा भागविणेकामी कठीण होत आहे व उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. त्यामुळे मानधनात रुपये १२,०००/- पर्यंत वाढ मिळावी म्हणून विनंती केलेली असल्याने, तसेच सदर सेवक हे कार्यरत असणे आवश्यक असल्याने त्यांचे मागणीनुसार त्यांचे मानधनात वाढ करणेत यावे अगर कसे व मानधनात वाढ करावयाची झाल्यास किती वाढ करणेत यावे याबाबत सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे शिफारसीने मा. सो.म.पा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १०-१०-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणचे अवलोकन होऊन सदरहू सेवकांनी मागणी केलेनुसार त्यांचे मानधनात रुपये १२,०००/- पर्यंत वाढ करणेस, मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ४३७, दिनांक २-११-१५ चे शिफारसीने आलेले प्रकरणास मान्यता देण्यांत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२८२ ठ. क्र.२११
दि.१५/२/१६............रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



टी.पी.४१, फा.प्लॉ.नं. ४०६ बागले वस्ती, बुधवार पेठ या जागेवर वारस नोंद लावून खरेदी खत करुन देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे भूमी व मालमत्ता कार्यालयाकडून खुल्या जागा जुन्या बाजार भावाप्रमाणे खरेदी देणे ही बाब धोरणात्मक बाब असून त्याप्रमाणे खरेदीची कार्यवाही ठेवावी लागणार आहे. प्रस्तुत प्रकरणी शामाबाई भिमसेन गायकवाड यांना खरेदी खत करुन देणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १३-६-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देण्यांत येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांनी सन २००५ साली अर्ज देऊन खरेदीखत करुन देणेविषयी वारंवार मागणी केलेली आहे. परंतू केवळ काहीतरी अपेक्षा बाळगून संबंधित खात्याच्या कर्मचारी व अधिकारी यांनी विनाकारण दप्तर दिरंगाई करुन सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवण्यात आलेचे दिसून येत आहे. यास आजला दहा वर्षाचा कालावधी लोटला असून, केवळ मानसिक त्रास देणे व अपेक्षावादीपणामुळे लोकांना त्रास देण्याचा संबंधितांचा डाव दिसून येत आहे ही एक अत्यंत गंभीर बाब असून, याबाबत प्रशासन प्रमुख अत्यंत असंवेदनशील भूमिका पार पाडत आहे. यामुळे मनपाबाबत शहरातील नागरिकांमध्ये वेगळा समज होत आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. याबाबत मा. आयुक्त यांनी दप्तर दिरंगाईबाबत संबंधितांवर सक्त कायदेशीर कारवाई करावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्राथमिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 263 ठ. क्र. २९६
दि. १६/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



स्थानिक संस्था कराबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ उप-विभाग दि. १ ऑक्टोंबर २०१५ असाधारण क्र. १०२ अधिसूचना क्र. स्थासंक-२०१५ प्र.क्र. १८१/नवि-३२ - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) च्या कलम १५२ थ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन मा. शासनाचे उपसचिव यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने हायस्पीड डिझेल ऑईल व पेट्रोल या वस्तूंवर दि. १ ऑक्टोंबर,२०१५ पासून स्थानिक संस्था कर लागू होणार नाही असे विनिर्दीष्ट केलेले आहे. तरी सदरची बाब मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-११-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास माहिती घेतली.

यापोटी महानगरपालिकेस गतवर्षी र.रु. १०.०० कोटी इतके उत्पन्न मिळाले असून, यास्तव मा. शासनाने र.रु. १०.०० कोटी महानगरपालिकेस अनुदान स्वरुपात देण्याबाबत ही सभा मा. शासनास विनंती करीत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २८४ ठ. क्र. २९९
दि. ९/८/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मलनित्सारण व्यवस्था सुधारणा प्रकल्पांतर्गत प्रताप नगर मलनित्सारण केंद्राकरिता आवश्यक एक्सप्रेस फिडर विद्युत जोडणी घेणेकरिता करावे लागणारे कामास, खर्चास, सदरचे काम करुन घेणेस, प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक र.रु. ५५,०५,२६१/- इतका खर्च अपेक्षित आहे. या कामाकरिता येणारा खर्च महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना सन २०११-१२ प्राप्त अनुदान या बजेट सदरी खर्ची पडणार आहे. MSEDCL कडे कनेक्शन चार्जेस घेणेकरिता रुपये १२,७३,७९०/- भरावयाची कार्यवाही स्वतंत्ररित्या करणेत येत आहे. तरी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मलनित्सारण व्यवस्था सुधारणा प्रकल्पांतर्गत प्रताप नगर मलनित्सारण केंद्राकरिता आवश्यक एक्सप्रेस फिडर विद्युत जोडणी घेणेकरिता करावे लागणारे कामास, खर्चास, सदरचे काम करुन घेणेस, कामाचे पूर्वगणनपत्रक र.रु. ५५,०५,२६१/- यांस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-११-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देण्यांत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुख्‍ो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२५५.ठ. क्र....३००
दि..९/०१/२०१६.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मलनित्सारण व्यवस्था सुधारणा प्रकल्पांतर्गत कुमठे मलनित्सारण केंद्राकरिता आवश्यक एक्सप्रेस फिडर विद्युत जोडणी घेणेकरिता करावे लागणारे कामास, खर्चास, सदरचे काम करुन घेणेस, प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे पूर्वगणनपत्रक र.रु. १,०२,५७,४०२/- इतका खर्च अपेक्षित आहे. या कामाकरिता येणारा खर्च महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना सन २०११-१२ प्राप्त अनुदान या बजेट सदरी खर्ची पडणार आहे. MSEDCL कडे कनेक्शन चार्जेस घेणेकरिता रुपये ५,६०,०४६/- भरावयाची कार्यवाही स्वतंत्ररित्या करणेत येत आहे. तरी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मलनित्सारण व्यवस्था सुधारणा प्रकल्पांतर्गत कुमठे मलनित्सारण केंद्राकरिता आवश्यक एक्सप्रेस फिडर विद्युत जोडणी घेणेकरिता करावे लागणारे कामास, खर्चास, सदरचे काम करुन घेणेस, कामाचे पूर्वगणनपत्रक र.रु. १,०२,५७,४०२/- यांस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-११-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देण्यांत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २९८ ठ. क्र. ३०१
दि. १५/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

२९८

सोलापूरातील प्रभाग क्र. ४२ मधील हाऊजा सुपर बजार ते संत निरंकारी भवन ते अमन हॉटेल या मार्गी **श्री. संत निरंकारी मार्ग** असे नामकरण करणेस, सदर ठिकाणी नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीने निर्णय घेण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका